14 JAN 2023 लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



परभणी येथील कृषी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. इंद्र मणी यांच्याकडे डॉ. निखिल गायकवाड यांनी कृतज्ञता निधी सुपूर्द केला. यावेळी डॉ. बब्रुवान गायकवाड, धीरज कदम, डॉ. पी. एस. बोरीकर, डॉ. डी. डब्ल्यू. वडनेरकर उपस्थित होते.

# प्राध्यापकांकडून कृषी विद्यापीठास साडेसात लाखांचा कृतज्ञता निधी

## परभणीच्या मातृसंस्थेस रक्कम : वडिलांच्या अमृतमहोत्सवानिमित्त उपक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : येथील शिवाजी विद्यापीठातील वनस्पतीशास्त्रज्ञ डॉ. निखिल गायकवाड यांनी त्यांच्या निवृत्त प्राध्यापक वडिलांच्या अमृतमहोत्सवानिमित्त त्यांची मातृसंस्था असलेल्या परभणी येथील वसंतराव नाईक कृषी विद्यापीठास साडेसात लाख रुपयांचा कृतज्ञता निधी प्रदान केला. या निधीमधून एन्टॅमॉलॉजी या विषयात एमएस्सी आणि पीएच.डी.मध्ये अव्वल स्थान प्राप्त करणाऱ्या दोन विद्यार्थ्यांना सुवर्णपदके प्रदान करण्यात येणार आहेत.

डॉ. बब्रुवान गायकवाड यांचे कृषी पदव्युत्तर शिक्षण परभणी येथील वसंतराव नाईक कृषी विद्यापीठातून १९६६ ते १९७२ या कालावधीत झाले. शिक्षणानंतर ते याच विद्यापीठात एन्टॅमॉलॉजी विभागात सहायक प्राध्यापक म्हणून रुजू झाले. त्यांनी हा निधी आई-वडील व कुटुंबीयांसह कृषी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. इंद्र मणी यांच्याकडे सुपूर्द केला. यावेळी कुलसचिव धीरज कदम, डॉ. पी. एस. बोरीकर, डॉ. डी. डब्ल्यू. वडनेरकर, डॉ. डी. आर. मुंडे, डॉ. भोसले उपस्थित होते.

महासत्ता

# कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांना राष्ट्रीय 'फेलो ऑफ दि सोसायटी' पुरस्कार

कोल्हापूर, ता. १२ (प्रतिनिधी)-

शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू आणि ज्येष्ठ संख्याशास्त्रज्ञ डॉ. दिगंबर शिर्के यांना इंडियन सोसायटी फॉर प्रॉबॅबिलिटी अँड स्टॅटिस्टिक्स या संख्याशास्त्रातील राष्ट्रीय आघाडीच्या संस्थेकडून 'फेलो ऑफ दि सोसायटी' हा सन्मानाचा पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले आहे. 'संख्याशास्त्र आणि वारंवारिता क्षेत्राच्या प्रगती आणि विकासात दिलेल्या लक्षणीय योगदाना'बद्दल हा पुरस्कार बहाल करण्यात येत असल्याचे संस्थेच्या प्रमाणपत्रात म्हटले आहे.

आंध्र प्रदेशातील तिरुपती मुख्यालय असणाऱ्या इंडियन सोसायटी फॉर प्रोबॅबिलिटी अँड स्टॅटिस्टिक्स (आयएसपीएस) आणि कोचीन येथील कोचीन युनिव्हर्सिटी ऑफ सायन्स अँड टेक्नॉलॉजी यांच्या संयुक्त विद्यमाने कोचीन येथे दि. ४ ते ६ जानेवारी या कालावधीत संस्थेची ४२ वी वार्षिक परिषद पार पडली. या परिषदेमध्ये शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांना 'फेलो ऑफ दि सोसायटी' हा प्रतिष्ठेचा पुरस्कार प्रदान करण्याचे नियोजन होते.

तथापि, या काळात पूर्वनियोजित महत्त्वपूर्ण बैठकीस उपस्थित राहावयाचे असल्याने कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या अनुपस्थितीत पुरस्काराची घोषणा करण्यात आली. नुकतेच डॉ. शिर्के यांना या पुरस्काराचे मानपत्र व प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे.

सकाळ



**कोल्हापूर :** परभणी येथील वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. इंद्र मणी यांच्याकडे दोन सुवर्णपदकांसाठी साडेसात लाख रुपयांचा कृतज्ञता निधी सुपूर्द करताना डॉ. निखिल गायकवाड. या वेळी डॉ. बब्रूवान गायकवाड, धीरज कदम, डॉ. पी.एस. बोरीकर, डॉ. डी. डब्ल्यू. वडनेरकर आदी.

# वडिलांच्या अमृतमहोत्सवानिमित्त कृषी विद्यापीठास कृतज्ञता निधी

## शिवाजी विद्यापीठातील डॉ. निखिल गायकवाड यांचे दातृत्व

कोल्हापूर, ता. १३ : शिवाजी विद्यापीठातील वनस्पतीशास्त्रज्ञ डॉ. निखिल गायकवाड यांनी आपल्या निवृत्त प्राध्यापक वडिलांच्या अमृतमहोत्सवानिमित्त त्यांची मातृसंस्था असलेल्या परभणी येथील वसंतराव नाईक कृषी विद्यापीठास साडेसात लाख रुपयांचा कृतज्ञता निधी प्रदान केला. या निधीमधून एन्टॅमॉलॉजी या विषयात एमएस्सी आणि पीएच. डी.मध्ये अव्वल स्थान प्राप्त करणाऱ्या दोन विद्यार्थ्यांना सुवर्णपदके प्रदान करण्यात येणार आहेत.

डॉ. गायकवाड यांचे वडील डॉ. बब्रुवान भानुदास गायकवाड यांचे कृषी पदवी व पदव्युत्तर शिक्षण परभणी येथील वसंतराव नाईक कृषी विद्यापीठातून १९६६ ते १९७२ या कालावधीत झाले. शिक्षणानंतर ते याच विद्यापीठात एन्टॅमॉलॉजी विभागात सहायक प्राध्यापक म्हणून रुजू झाले. १९७५ ते १९९० या कालावधीत ते तेथे कार्यरत होते. त्यानंतर याच विद्यापीठाअंतर्गत लातूर येथील कृषी महाविद्यालयात सहयोगी प्राध्यापक म्हणून त्यांनी १९९० ते १९९४ अशी सेवा बजावली. त्यानंतर राहुरीच्या महात्मा फुले कृषी विद्यापीठात प्राध्यापक म्हणून निवड होऊन ते कोल्हापूरच्या कृषी महाविद्यालयात नियुक्त झाले. तेथेच २००५ साली सेवानिवृत्त झाले. यंदा ते अमृतमहोत्सवी वर्ष पूर्ण करीत आहेत.

वडिलांच्या या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त डॉ. निखिल गायकवाड यांनी ७ लाख ५० हजार रुपयांचा कृतज्ञता निधी वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाला दोन सुवर्णपदकांच्या निर्मितीसाठी प्रदान केला. नुकताच त्यांनी हा निधी आई-वडील व कुटुंबियांसह परभणी कृषी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. इंद्रमणी यांच्याकडे सुपूर्द केला. यावेळी वडिलांच्या तत्कालीन सहकारी प्राध्यापकांना देखील निमंत्रित करण्यात आले होते. यावेळी कुलसचिव धीरज कदम, डॉ. पी. एस. बोरीकर, डॉ. डी. डब्ल्यू. वडनेरकर, डॉ. डी. आर. मुंडे, डॉ. एम. बी. भोसले आदी उपस्थित होते.

सकाळ

# राजर्षी शाहू महाविद्यालयात व्याख्यानमाला

कोल्हापूर : राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालयात शिवाजी विद्यापीठ, महाविद्यालयाच्या मराठी विभागातर्फे पी. बी. साळुंखे व्याख्यानमाला झाली. 'महात्मा जोतिबा फुले : जीवन व कार्य' यावर शिवाजी विद्यापीठाचे उपकुलसचिव डॉ. प्रमोद पांडव म्हणाले, "महात्मा फुले यांचे कार्य हे समाजाला दिशा देणारे होते. ते युगपुरुष आणि सावित्रीबाई फुले युगस्त्री होत्या." प्राचार्य डॉ. एल. डी. कदम म्हणाले, "महात्मा फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना करून समाज हिताची अनेक कामे केली." (कै.) साळुंखे यांचे नातू अभिजित साळुंखे उपस्थित होते. उपप्राचार्या डॉ. सिंधू आवळे यांनी स्वागत केले. सांस्कृतिक विभागप्रमुख डॉ. भाग्यश्री पुणतांबेकर यांनी परिचय करून दिला. डॉ. महेश रणदिवे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. अंकुश घुले यांनी आभार मानले.